सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण**

एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,

E-MAIL ID – lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७

---

**प्रेस नोट क्र. ०९** **दिनांक :- १९/०३/२०२४**

## अंबरनाथ येथे मिसींग असलेल्या महीलेचा खुन करुन तिचा मृतदेह भिवंडी तालुक्यातील अनगांव येथील एका पडीक घरात पुरुन पुरावा नष्ट करणारे आरोपीतास स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीणचे पोलीसांकडुन अटक

मा. श्री. डॉ. डी. एस स्वामी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण तसेच श्रीमती डॉ. दिपाली घाटे, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी जिल्हाचे कार्यक्षेत्रामधील दाखल मालमत्तेचे व शरीराविरुध्दचे गुन्हे डघडकीस आणणे कामी व त्यास प्रतीबंध करणेकामी सुचना दिल्या होत्या त्यानुसार श्री. सुरेश मनोरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांनी जिल्हयात दाखल असलेले मालमत्तेचे व गंभीर शरीराविरुध्दचे गुन्हे उघडकीस आणणे कामी वेग-वेगळे पथक तयार करुन त्यांना मार्गदर्शन केले.

त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण वाशिंद युनिटचे पो.उप.निरीक्षक महेश कदम, पो.हवा/२४०७ प्रकाश साईल, पो.हवा/२५०७ संतोष सुर्वे, पो.हवा/७७९ सतीष कोळी, पोहवा/२८४२ विभुते, पो.शि/३२८० स्वप्नील बोडके असे वाशिंद युनिट अंतर्गत गुन्हेगार वॉच पेट्रोलींग करीत असताना वरील पथकास त्यांचे गुप्त बातमीदार यांचेकडुन बातमी मिळाली की, अंबरनाथ येथील शिवाजी नगर पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे दाखल असलेल्या मिसींग महीला ज्योत्स्ना दिगंबर शेलार वय २७ वर्षे हिचा खुन झालेला असल्याची माहीती मिळाली त्यावरुन वरील पथकाने कोणताही धागादोरा नसताना अथक परीश्रम घेवुन आपले गुप्त बातमीदारांचे मार्फतीने सदरचा गुन्हा करणारा आरोपीत मिसींग महीलेचा पती दिगंबर प्रकाश शेलार वय २९ वर्षे रा.मु.पो.अनगाव ता. भिवंडी जि.ठाणे यास ताब्यात घेवुन त्याचेकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याने आपली मिसींग असलेली पत्नी ज्योत्स्ना दिगंबर शेलार हिस जिवे ठार मारुन पुरावा नष्ट करण्याचे इरादयाने तिचे प्रेत मौजे अनगांव येथे भिवंडी वाडा रोडचे पश्चीमेस सुमारे १५० मिटर अंतरावर एका पडीत घरात पुरुन पुरावा नष्ट केल्याची कबुली दिलेली आहे.

सदरची माहीती स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीणचे पोलीसांनी गणेशपुरी पोलीस ठाण्याचे प्रभारी श्री. धर्मराज सोनके, सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना कळवली असता त्यांनी व त्यांचे पथकाने मा. तहसीलदार यांचे समक्ष प्रेत उकरले असता तेथे मयत ज्योत्स्ना दिगंबर शेलार हिचा मृतदेह आढळुन आलेला असुन त्याबाबत गणेशपुरी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ६४/२०२४ भादंविसंक ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे. मयत महीलेचा पती आरोपीत दिगंबर प्रकाश शेलार यास पुढील कार्यवाही कामी गणेशपुरी पोलीस ठाण्याचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखा ठाणे ग्रामीणचे मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. सुरेश मनोरे यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप.निरीक्षक महेश कदम, पो.हवा/२४०७ प्रकाश साईल, पो.हवा/२५०७ संतोष सुर्वे, पो.हवा/७७९ सतीष कोळी, पोहवा/२८४२ विभुते पो.शि/३२८० स्वप्नील बोडके यांचे पथकाने उघडकीस आणलेला असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/धर्मराज सोनके, प्रभारी अधिकारी, गणेशपुरी पोलीस ठाणे हे करीत आहे.

************************************************************************